**सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवित (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पाल्यांना "शैक्षणिक सहाय्य योजना" लागू करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: इबांका-०५२६/प्र.क्र.७१(III)/काम-७**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ जुलै, २०२६

**वाचा-**

१. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्थी) अधिनियम, १९९६
२. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७
४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, अधिसूचना क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७६/कामगार-७, दिनांक ३०.११.२०२३
५. केंद्र शासनामार्फत निर्गमित सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० दिनांक २१.११.२०२५
६. सामाजिक सुरक्षा संहिता (केंद्रीय) नियम, २०२५ दिनांक ३०.१२.२०२५
७. महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ (मसूदा) दिनांक ०५.०५.२०२६
८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बैठकीतील ठराव क्र.६५ (१-११)/२०२६, दिनांक १२.०५.२०२६
९. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.१२३४/२०२६/कायदा-२०२६/प्र.क्र.१३/मंडळ-०१, दिनांक १९.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचे व सेवाशर्तींचे नियमन करण्यासाठी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य आणि त्यांच्याकरीता कल्याणकारी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला होता. त्यास अनुसरुन इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ तयार करण्यात आले. सदर अधिनियमाच्या कलम १८ अन्वये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने दिनांक २६.०६.१९९६ च्या अधिसूचनेद्वारे एकुण प्रकल्प खर्चाच्या १% (जमिनीचे मूल्य वगळता) इतका उपकर निश्चित केला आहे. त्यानुसार राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची

मंडळामार्फत नोंदणी व नुतनीकरण करण्यात येऊन मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराच्या निधीमधून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध कल्याणकरी योजना राबविल्या जात आहेत.

केंद्र शासनाने २९ कामगार कायदे निरसित करुन चार नवीन कामगार संहितांची (Labour Codes) अंमलबजावणी दिनांक २१.११.२०२५ पासून संपूर्ण देशात सुरु केली आहे. त्याअंतर्गत संदर्भिय क्र.१ व २ येथील अधिनियम निरसित करण्यात आले असून आता इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाशी संबंधित बाबींचा समावेश "सामाजिक सुरक्षा संहिता-२०२०" मध्ये करण्यात आला आहे.

सदर संहितेच्या कलम (७) (६) मध्ये बांधकाम कामगारांना कोणत्या बाबींकरीता विविध कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे, याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. यानुसार कलम (७) (६) (d) मध्ये *"frame educational schemes for the benefit of children of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government"* अशी तरतूद नमूद केली आहे.

या तरतुदीस अनुसरुन मंडळाने दिनांक १२.०५.२०२६ रोजीच्या बैठकीत ठराव पारीत करुन संदर्भिय क्र.९ अन्वये मंडळांतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना विविध शैक्षणिक सहाय्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

शिक्षण हक्क कायदा, २००९ अंतर्गत वय वर्षे सहा ते चौदा वयोगटामधील (इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी) सर्व मुलांना मोफत शिक्षण देण्यात येते. त्यामुळे थेट अनुदान स्वरूपात सहाय्याची आवश्यकता नसली तरी, अन्य मुलभूत वस्तूंची त्यांना गरज पडते असते. इयत्ता आठवी नंतरच्या पाल्यांच्या शिक्षणाचा आर्थिक भार बांधकाम कामगारांवर पडतो. पाल्यांच्या शिक्षणामध्ये इयत्ता दहावी व इयत्ता बारावी हे दोन महत्वाचे टप्पे असतात, अशावेळी त्यांचे शिक्षण खंडीत होवू नये, याची विशेष काळजी घेणे आवश्यक ठरते. या सर्व बाबींचा विचार करून, विविध वयोगटनिहाय व पाल्यांच्या भविष्याचा विचार करून, यापूर्वी मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सुरु असलेल्या योजना रद्द करुन सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० मधील उक्त तरतूदीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता सुधारित **"शैक्षणिक सहाय्य योजना"** लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवित (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांकरीता यापूर्वी सुरु असलेल्या सर्व शैक्षणिक सहाय्य योजना बंद करुन सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० मधील उक्त तरतूदीच्या अनुषंगाने, सुधारित **"शैक्षणिक सहाय्य योजना"** लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार सदरहू योजनेअंतर्गत सात शैक्षणिक बाबींचा समावेश असून त्याकरीता योजनेचे नाव, पात्रता निकष, वित्तीय सहाय्य आणि आवश्यक कागदपत्रे याबाबतचा गोषवारा यासोबतच्या **"प्रपत्र-अ"** मध्ये नमूद केला आहे.

२. मुलभूत वस्तू संचाकरीता आवश्यक असलेल्या वस्तूंची निवड महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई शासन मान्यतेने अंतिम करेल.

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणाऱ्या उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात यावा.

४. सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार वरीलप्रमाणे मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता सुधारित केलेल्या शैक्षणिक सहाय्य योजनांबाबत मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये या शासन निर्णयातील तरतुदींनुसार आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात यावेत.

५. अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास त्यांना देय होणाऱ्या लाभाची वसूली करुन, सदरहू कामगार फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरेल.

६. सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्यात येईल. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१३१३०२४०८०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.07.13 13:03:27 +05'30'

**(दिपक पोकळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा, अल्पसंख्याक), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१२. सर्व मा. विधानसभा सदस्य
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
१४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई.
१६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई
१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१८. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१९. निवड नस्ती

# "प्रपत्र-अ"

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता नववी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना | ➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिले दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ यापूर्वी मंडळाच्या E-01 (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावीसाठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरच्या पाल्यास या योजनेतील लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>➢ ज्या दिनांकास पाल्य नववी उत्तीर्ण झाला असेल, (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये या योजनेच्या लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.२०,०००/- प्रति पाल्य इतक्या लाभाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्याचे इयत्ता नववी मधील शाळेचे ओळखपत्र<br>(iii) पाल्याचे इयत्ता नववीमध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| २ | इयत्ता अकरावी उत्तीर्ण पाल्यास पुढील शिक्षणाकरीता सहाय्य योजना | ➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिले दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ यापूर्वी मंडळाच्या E-01 (इयत्ता पहिले ते सातवी आणि इयत्ता आठवी ते दहावी साठी सहाय्य) E-02 (इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावी मध्ये किमान ५०% गुण प्राप्त साठी सहाय्य) व E-03 (इयत्ता अकरावी ते बारावी साठी सहाय्य) योजनेचा पाल्याकरीता लाभ घेतला असल्यास, सदरच्या पाल्यास या योजनेतील लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>➢ ज्या दिनांकास पाल्य इयत्ता अकरावी उत्तीर्ण झाला असेल, (गुणपत्रिकेवरील दिनांक) त्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये या योजनेच्या लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. तद्नंतरचा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.२५,०००/- प्रति पाल्य इतक्या लाभाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्याचे इयत्ता अकरावी मधील शाळेचे ओळखपत्र<br>(iii) पाल्याचे इयत्ता अकरावी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय पदवी सहाय्य योजना | (१) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना वैद्यकीय क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेण्याकरीता शैक्षणिक सहाय्य म्हणून राबविण्यात येणाऱ्या सदरच्या योजनेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षासाठी या योजनेच्या लाभाकरीता सदर पाल्य पात्र राहील.<br>➢ वैद्यकीय क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.१,००,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष इतक्या लाभाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्य ज्या महाविद्यालयात पदवी करीता आहे, त्या महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ४ | अभियांत्रिकी पदवी सहाय्य योजना | (१) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना अभियांत्रिकी क्षेत्रामधील कोणत्याही पदवीकरीता कोणत्याही शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेण्याकरीता शैक्षणिक सहाय्य म्हणून राबविण्यात येणाऱ्या सदरच्या योजनेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ बांधकाम कामगाराचा पती / पत्नी सदर योजनेस पात्र राहणार नाही.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ पदवीच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाल्यानंतर त्या उत्तीर्ण वर्षासाठी या योजनेच्या लाभाकरीता सदर पाल्य पात्र राहील.<br>➢ अभियांत्रिकी क्षेत्रामधील पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास सदरची योजना लागू राहणार नाही. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.६०,०००/- प्रति पाल्य प्रति वर्ष इतक्या लाभाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्य ज्या महाविद्यालयात पदवी करीता आहे, त्या महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र<br>(iv) उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ५ | निवासी सैनिक शाळांमधील शिक्षणाकरीता सहाय्य योजना | (१) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना निवासी सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेण्याकरीता शैक्षणिक सहाय्य म्हणून राबविण्यात येणाऱ्या सदरच्या योजनेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-<br>**(अ) केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गतच्या सैनिक शाळा:-**<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.<br>➢ कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना या योजनेच्या लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य या योजनेच्या लाभाकरीता पात्र राहणार नाही. | सदर योजनेअंतर्गत पाल्य ज्या शैक्षणिक वर्षात असेल, त्या शैक्षणिक वर्षापासून पाल्याच्या दर वर्षीच्या अभ्यासक्रम शुल्काची (Tution Fee) पूर्ण प्रतिपूर्ती करण्यात येईल. तथापि, याकरीता दरवर्षी अर्ज करणे आवश्यक राहील. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र<br>(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र |
| | | **(ब)शासन मान्यता प्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळा:-**<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनूज्ञेय राहील.<br>➢ कोणत्याही शैक्षणिक वर्षात असताना या योजनेच्या लाभाकरीता अर्ज करण्यास पात्र राहील. शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करून अथवा कोणत्याही कारणास्तव निवासी सैनिक शाळा सोडल्यानंतर पाल्य लाभास पात्र राहणार नाही. | सदर योजनेअंतर्गत प्रति पाल्यास एकवेळचा लाभ म्हणून रक्कम रू.१०,०००/- इतक्या लाभाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्याचे निवासी सैनिक शाळेचे ओळखपत्र<br>(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
| --- | --- | --- | --- | --- |
| ६ | परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. सहाय्य योजना | (१) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या पाल्यांपैकी दरवर्षी केवळ २५ पाल्यांकरीता शैक्षणिक सहाय्य म्हणून राबविण्यात येणाऱ्या सदरच्या योजनेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. | (i) सदर योजनेअंतर्गत अभ्यासक्रम शुल्क (Tuition Fee) हे संबधित विद्यापीठास थेट वर्ग करण्यात येईल.<br>(ii) केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबधित विद्यार्थ्यास तद्अनुषंगिक भत्ते (Substantial Allowances), प्रवास भत्ता, विमा व इतर शुल्क अदा करण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्य ज्या महाविद्यालयात पदवी करीत आहे, त्या महाविद्यालयाचे ओळखपत्र<br>(iii) पाल्याचे पदवी मध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ७ | मुलभूत वस्तू संच (Basic Item Kit) सहाय्य योजना | (१) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या इयत्ता पहिली ते इयत्ता आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिल्या दोन पाल्यांना मुलभूत वस्तू संच सहाय्य योजना DBT in Kind पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या सदरच्या योजनेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत:-<br>➢ नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची पहिली दोन पाल्ये या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ पती व पत्नी दोघेही बांधाकाम कामगार म्हणून मंडळाकडे नोंदित असल्यास केवळ एकच लाभ अनुज्ञेय राहील.<br>➢ इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीपर्यंत पाल्य एकवेळ लाभार्थी म्हणून पात्र राहील. तथापि, मुलभूत वस्तू संचामध्ये बदल केल्यानंतर नवीन संचाकरीता पात्र राहील. | सदर योजनेअंतर्गत रक्कम निश्चित केलेल्या मुलभूत वस्तू संचाची शासनाच्या खरेदी धोरणानुसार खरेदी करून, प्रति पाल्य एकवेळचे सहाय्य देण्यात येईल. | (i) पाल्याचे आधार ओळखपत्र<br>(ii) पाल्याचे शाळेचे ओळखपत्र<br>(iii) चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र |

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.07.13 13:03:54 +05'30'

**(दिपक पोकळे)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**